# आधिमान्यता

Page No.
Date: / /

1) प्रस्तावना -

आधिमान्यता ही राज्यशास्त्रातील महत्वाची संकल्पना आहे. सत्तेला किंवा शक्तीला मान्यता किंवा स्विकृती प्राप्त होणे गरजेचे आहे. सत्ता व प्रभाव याला आधिमान्यता मोलाची असते. आधिमान्यतेशिवाय सत्ता ही आपले वर्चस्व गाजवू शकत नाही. लोकशाहीमध्ये आधिमान्यतेला खूपच महत्व असते. सत्तेला वैधता प्राप्त करण्यासाठी आधिमान्यतेची आवश्यकता असते. आधिमान्यता ही संकल्पना प्राचीन काळापासून आस्तित्वात असली तरी वर्तमान काळात आधिमान्यतेला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. मॅक्स वेबर, कार्ल स्किमीट, सिमोर मार्टिन लिप्से, रॉबर्ट डाल इत्यादी अनेक विचारवंतांनी आधिमान्यतेचा विचार मांडला आहे. मॅक्स वेबरला आधिमान्यता या संकल्पनेचा जनक मानले जाते.

2) आधिमान्यता या शब्दाची उत्पत्ती -

आधिमान्यता या शब्दाला इंग्रजीमध्ये Legitimacy असे म्हणतात. Legitimacy हा शब्द लॅटिन भाषेतील Legitimus या शब्दापासून बनलेला आहे. त्याचा अर्थ वैधानिक किंवा कायदेशीर असा होतो. सत्तेला मान्यता मिळाल्यास ती कायदेशीर ठरते. आधिमान्यतेला वैधता हा पर्यायी शब्द आहे.

3) आधिमान्यतेचा अर्थ -

आधिमान्यता ही संकल्पना व्यापक स्वरुपाची आहे. सत्तेला लोकांची मान्यता, स्विकृती, संमती वैधता असणे म्हणजे आधिमान्यता होय.
आधिमान्य सत्ता ही आधिसत्ता बनते. सत्तेला किंवा

Scanned with CamScanner

प्रभावाला लोकांनी विश्वास व संमतीच्या स्वरुपात दि-
लेली मान्यता आहे. विश्वासार्हता व स्विकृती/मान्यता
यावर अधिमान्यता आधारलेली असते. सत्ताधिशावर
लोकांचा विश्वास असला पाहिजे. सत्ताधिशांनी
ती विश्वासार्हता जपली पाहिजे.

आधिमान्यतेची व्याख्या -

आधीमान्यतेचा विचार अनेक विचारवंतानी मांडला आहे. त्यापैकी काही निवडक विचारवंताच्या विचारांचा उल्लेख पुढीलप्रमाणे करता येईल.

I) मॅक्स वेबरच्या मते, -

विश्वासावर आधारलेली व्यवस्था म्हणजे अधिमान्यता होय.

II) लिप्सेटच्या मते, -

लिप्सेट यानी पॉलिटिकल मॅन या ग्रंथात अधिमान्यतेची अशी व्याख्या केली आहे की, राजकीय व्यवस्थेत विश्वास निर्माण करुन कायम ठेवणे म्हणजे आधीमान्यता होय.

III) डॉल्फ स्टर्न बर्नरच्या मते, -

शासनाला शासन करण्याचा अधिकार आहे असे वाटणे, आणि त्याला शासिताची मान्यता मि[ळणे] म्हणजे अधिमान्यता होय.

IV) जेन ब्लॉंडेलच्या मते, -

जेव्हा लोक राज्यसंस्थेच्या सत्तेला बिनतक्रार स्विकारतात, तेव्हा त्या स्विकृतीला आधीमान्य[ता] असे म्हणतात.

४) आधिमान्यतेचे प्रकार किंवा वर्गीकरण -
1) प्रस्तावना -
2) आधिमान्यतेचा अर्थ -
3) आधिमान्यतेचे प्रकार -

स्टर्न बर्जर, मॅक्स वेबर, आणि रॉबर्ट डहाल यांनी आधिमान्यतेचे वर्गीकरण केले आहे.

i) स्टर्न बर्जर च्या मते, -

स्टर्न बर्जर यांनी आधिमान्यतेचे दैवी आधिमान्यता व नागरी आधिमान्यता अशा दोन भागांमध्ये वर्गीकरण केले आहे. याचा सविस्तर विचार पुढील प्रमाणे करता येईल.

दैवी आधिमान्यता -

ही आधिमान्यता अध्यात्मावर, ईश्वर किंवा देवावर आधारित आहे. ईश्वराने, देवाने दिलेल्या मान्यतेला दैवी आधिमान्यता असे म्हणतात. ही आधिमान्यता राजेशाही मध्ये दिसून येते. राजा हा ईश्वराचा दूत किंवा प्रतिनिधी असतो. राज्याच्या सत्तेला ईश्वराची मान्यता असते. ईश्वरी शक्तीच्या प्रेरणेने राजा कार्य करतो, असे स्टर्न बर्जर यांचे मत आहे.

नागरी आधिमान्यता -

शासनाला किंवा शासनाच्या कायदा समाजातील लोक मान्यता देतात, त्याला नागरी आधिमान्यता असे म्हणतात. शासनाचे धोरण जनहिताचे असल्यास त्याला जनतेची मान्यता प्राप्त होत असते. त्यास नागरी आधिमान्यता असे म्हणतात.

ii) मॅक्स वेबरच्या मते, -

मॅक्स वेबर यांनी परंपरागत

Scanned with CamScanner

आधिमान्यता, कायदेशीर आधिमान्यता, वलयांकित आधिमान्यता या तीन भागात वर्गीकरण केले आहे त्याचा विचार पुढीलप्रमाणे मांडता येईल.

1) परंपरागत आधिमान्यता -

रूढी, परंपरा, चालिरीति, संकेत यानुसार एखाद्याच्या आदेशाचे पालन केले जात असेल तर त्यास परंपरागत आधिमान्यता असे म्हणतात. उदा. राजाच्या आदेशाचे पालन करणे. जुन्या काळात देशमुख, साहुकार, पाटील या पदव्या दिल्या जात होत्या त्यांच्या आदेशाचे पालन समाजातील लोक करीत होते त्यांना मान्यता देत होते, याला परंपरागत आधिमान्यता असे म्हणतात.

2) कायदेशीर आधिमान्यता -

कायदेशीर आधिमान्यतेला बौद्धिक आधिमान्यता असेही म्हणतात. कायदयामुळे लोक एखाद्या पदावरील व्यक्तीच्या आदेशाचे पालन करत असतील तर त्यास कायदेशीर आधिमान्यता असे म्हणतात. विवेक किंवा बुद्धी हा कायदयाचा आधार असतो.

3) वलयांकित / करिश्मात्मक आधिमान्यता -

वलयांकित आधिमान्यतेला करिश्मात्मक आधिमान्यता असेही म्हणतात. काही व्यक्तीकडे उपजत कला, गुण असतात. त्या कलागुणांमुळे त्यांचा प्रभाव इतर व्यक्तीवर पडत असतो. इतर व्यक्ती त्यांच्या आदेशाचे पालन करतात. त्यास वलयांकित आधिमान्यता असे म्हणतात. उदा. बाळासाहेब ठाकरेंच्या आदेशाचे पालन महाराष्ट्रातील बहुसंख्य करत होते.

Scanned with CamScanner

iii) रॉबर्ट डहालच्या मते,-

रॉबर्ट डहाल यांनी उच्चस्तरीय आधिमान्यता, दुर्बल आधिमान्यता या दोन भागात आधि-मान्यतेचे वर्गीकरण केले आहे.

1) उच्चस्तरीय आधिमान्यता-

लोकशाही शासनव्यवस्थेचा स्विकार करणाऱ्या देशातील लोक स्वच्छेने सरकारच्या निर्णयाला, धोरणाला, कायदयाला उत्सुफूर्तपणे मान्यता देत असतील तर त्यास उच्चस्तरीय आधिमान्यता असे म्हणतात ही आधिमान्यता मिळणे सरकारच्या यशासाठी महत्वाचे असते.

2) दुर्बल आधिमान्यता-

सरकारनी घेतलेल्या निर्णयाला, धोरणाला, कायदयाला लोक उत्सुफूर्तपणे मान्यता देत नाहीत, अनेक वेळा सरकार बळजबरीच्या मार्गाचा वापर करुन लोकांची मान्यता मिळवली जाते, त्यास दुर्बल आधिमान्यता असे म्हणतात. मान्यता मिळवण्यासाठी सरकारद्वारे स्वत: प्रयत्न केला जातो तेव्हा त्यास दुर्बल आधिमान्यता असे म्हणतात. यामुळे जनतेवर अन्याय, अत्याचार होत अस-तो. दुर्बल आधिमान्यता जनहिताच्या दृष्टीने अयोग्य असते.

अशाप्रकारे वरीलप्रमाणे आधिमान्यतेचे वर्गीकरण केले जाते.

आधिमान्यतेचे घटक / प्राप्तीचे मार्ग / साधने-

1) प्रस्तावना-

2) आधिमान्यता प्राप्तीचे मार्ग-

राजकीय व्यवस्थेमध्ये सरकारला आधिमान्यता प्राप्त होणे महत्वाचे असते. आधिमान्यता प्राप्त करण्याचे अनेक मार्ग असतात. त्या मार्गाचा विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

Scanned with CamScanner